जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगरमध्ये महाविकास आघाडी व भाजपाची झाली अनोखी युती

## दोन्ही गटांनी एकत्र येत अपक्ष उपसरपंचावर आणला अविश्वास ठराव



देहरे ग्रामपंचायतच्या उपसरपंचावरील अविश्वास ठरावाबाबतच्या विशेष सभेला उपस्थित असलेले तहसीलदार संजय शिंदे व ग्रामपंचायत सदस्य.

नगर - राज्यात सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीच्या नेत्यांचे विळ्या भोपळ्याचे नाते असल्याचे पहावयास मिळत असताना नगर तालुक्यात मात्र महाविकास आघाडी आणि भाजपाच्या सदस्यांनी एकत्र येत अपक्ष निवडून आलेल्या आणि उपसरपंच झालेल्यावर अविश्वास ठराव आणून त्याला पदमुक्त केले आहे. या दोन्ही गटांनी एकत्र येत एकमताने हा अविश्वास ठराव १२ विरुद्ध १ असा संमत केला आहे. हा राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

नगर तालुक्यातील देहरे गावात ३१ जुलै रोजी उपसरपंच दीपक नाना जाधव यांच्यावर हा अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला आहे. देहरे ग्रामपंचायतच्या १३ सदस्यांच्या निवडीसाठी सन २०२१ मध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली होती. या निवडणुकीत भाजपाचे (कर्डिले गट) ६ आणि महाविकास आघाडीचे ६ सदस्य निवडून आले होते. तर दीपक जाधव हे अपक्ष निवडून आले होते. ग्रामपंचायत ची सत्ता मिळविण्यासाठी अपक्ष दीपक जाधव यांना मोठे महत्व प्राप्त झाले होते. अखेर कर्डिले गटाने त्यांना गळाला लावत त्यांचा पाठींबा घेत सरपंच पद मिळविले. हिराबाई करंडे या सरपंच झाल्या तर जाधव यांना पाठींब्याच्या बदल्यात उपसरपंच पद देण्यात आले. त्यानंतर नंदा भगत आणि सध्या कल्याणी धनवटे या सरपंच आहेत, मात्र उपसरपंच पदावर जाधव हे कायम होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून उपसरपंच जाधव यांच्या कार्यपद्धतीबाबत दोन्ही गटाच्या सदस्यांमध्ये नाराजी होती. या नाराजी मुळे दोन्ही गटाचे सदस्य एकत्र आले आणि त्यांनी २५ जुलै रोजी तहसीलदार संजय शिंदे यांच्याकडे उपसरपंच जाधव यांच्या विरुद्ध अविश्वास ठराव दाखल केला. जाधव हे आपल्या उपसरपंच पदाच्या अधिकाराचा गैरवापर करतात, कामात कुचराई करतात, गावातील विकास कामांसाठी वेळ देत नाहीत, त्यामुळे त्यांनी गावातील ग्रामस्थांचा विश्वास गमावला असल्याचे कारण सदर अविश्वास ठराव दाखल करताना दिले होते.

या ठरावावर सरपंच कल्याणी मेघनाथ धनवटे, सदस्य प्रकाश श्रीहरी लांडगे, बाळासाहेब साहेबराव बर्डे, अश्विनी शरद जाधव, नंदा संतोष भगत, शितल आण्णासाहेब चोर, रोहिणी नवनाथ करंडे, जयश्री किरण लांडगे, अजित सर्जेराव काळे, साजिद अब्दुल शेख, हिराबाई अजित करंडे, अनिता रमेश काळे या दोन्ही गटाच्या एकूण १२ सदस्यांनी सह्या केल्या होत्या. तहसीलदार संजय शिंदे यांनी या ठरावावर चर्चा करण्यासाठी ३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सर्व ग्रामपंचायत सदस्यांची विशेष सभा बोलावली होती. या सभेस सह्या करणारे सर्व १२ सदस्य उपस्थित होते तर उपसरपंच जाधव हे अनुपस्थित होते. तहसीलदार शिंदे यांनी ठरावाच्या बाजूने मतदान करणाऱ्या सदस्यांचे मतदान घेतले असता सर्व १२ सदस्यांनी या अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे तहसीलदार शिंदे यांनी सदरचा अविश्वास ठराव १२ विरुद्ध १ असा मंजूर करण्यात येत असल्याचे घोषित केले. या प्रक्रियेत त्यांना ग्रामविकास अधिकारी कृष्णा बडे, मंडल अधिकारी साळुंके, महसूल अधिकारी मोरे यांनी सहाय्य केले.

### नूतन उपसरपंच पदाबाबत उत्सुकता शिगेला

महाविकास आघाडी व भाजपाच्या सदस्यांनी अनोखी युती करत अपक्ष असलेल्या उपसरपंचावर अविश्वास ठराव आणला, आता नवीन उपसरपंच कोण होणार याची ग्रामस्थांसह तालुक्याच्या राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. नवीन उपसरपंच निवडीच्या वेळीही ही अनोखी युती कायम राहणार का? राहिली तर उपसरपंच कोणत्या गटाचा होणार? कारण सरपंच कल्याणी धनवटे या कर्डिले गटाच्या म्हणजेच भाजपाच्या आहेत. मग उपसरपंचपद महाविकास आघाडीला मिळणार का? जर तसे झाले तर सत्ताधारी आणि विरोधक असे दोन्ही गट सत्तेत येवू शकणार आहेत. त्यामुळे ही अनोखी युती तालुक्याच्याच नव्हे तर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरणार हे नक्की.

## प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन 'मुसाफिर'-९८२२०२०६९१

### स्वत:चे...मनाचे ऐकत जावे...



प्रेरक वक्त्या बी. के. शिवानी म्हणतात, ''बाहेरचे सर्व काही आपल्या नियंत्रणात असते आणि जे आपले आहे ते आता आपल्या नियंत्रणात नसते असे का होते?''

दोन प्रकारचे गोंगाट असतात. एक बाहेरचा अन् दुसरा आपल्या आत असतो,. आपण या कानांनी काहीही ऐकू शकत नाही. जेव्हा बाहेर गोंगाट असतो आत (मनात, ह्रदयात) गोंगाट असतो तेव्हा आपण तो ऐकू शकतो पण समजू शकत नाही.

बाहेरचा गोंगाट आपल्या हातात नसतो पण आत मनाची स्थिती काय असावी ती पूर्णपणे आपल्या हातात असते. आपण अशा युगातून जात आहोत, जिथे लोकांना वाटते की मनावर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे कारण आपण आपल्या मनाचे नियंत्रण इतरांकडे, दुसऱ्यांकडे दिले आहे. (त्यामुळेच आज वैयक्तिक व सामाजिक मनोवस्था विचीत्र, अशांत, अस्वस्थ बनून समाधान, शांती आढळत नाहीय.)

आज कोणाला भाग्यवान म्हणायचे? ज्याचे शरीर, मन, नातेसंबंध व संपत्ती योग्य आहे. जीवन जगण्यासाठी फक्त ४ गोष्टींची आवश्यकता असते. परंतु या सर्वांची सुरुवात मनापासून होते. आपण खात्री करतो की, जीवनासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा कोणी दुसऱ्या वातावरणातून येतो तेव्हा त्याच्या येण्याबरोबरच वातावरणात बदल जाणवतो. ती सात्त्विकता, तो साधेपणा, ते प्रेम, ती आत्मीयता फक्त मनात राहात नाही. ती वातावरणात पसरते. कारण विश्वाची निर्मिती संकल्पाने होते जसे आपण अभ्यासाला विद्या म्हणतो मग कशाचा अभ्यास?

आज जग बहुतेक बाह्य जगाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करते. बाह्य जगाचा विचार येतो तेव्हा आपल्याला सर्व काही माहित असते पण आपल्याच मनात काय चाललय हे आपणास कळत नाही. आपण मनाला शांत, समाधानी करू शकत नाही. तात्पर्य, खरं आत्मसंवाद करणं जीवन असावे खुद दिलसे दिलने बात करना चाहिए. आपणाचि वाद आपणाशी करावा... हेच खरं जगणं... यालाच मेडिटेशन म्हणावं का? यालाच ध्यानधारणा, समाधीवस्था म्हणावी का?...

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर - पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना भिंगारच्या आलमगीर परिसरात २९ जुलै रात्री ११.३० ते ३० जुलै रोजी पहाटे ३ वाजण्याच्या दरम्यान घडली.

मुलीच्या कुटुंबियांना मुलगी घरात नसल्याचे निदर्शनास आल्यावर मुलीच्या पालकांनी तिचा भिंगार परिसर, तिच्या मैत्रिणीकडे, तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. यावरुन तिचे कोणीतरी अज्ञाताने अपहरण केल्याची खात्री झाली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अपहृत मुलीच्या पालकांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पल्लवी वाघ या करीत आहेत.

# नाफेड कांदा खरेदी घोटाळेबाजांवर कारवाई करा

नगर - नाफेड व एन सी सी एफ मार्फत होणाऱ्या कांदा खरेदीत गैरप्रकार झाल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. जिल्हा उपनिबंधक ( सहकारी संस्था) नाशिक यांनी केलेल्या पाहणीत ही सिद्ध झाले आहे. सर्व खरेदी केंद्रांची तातडीने तपासणी करून दोषींवर कारवाई करावी व दक्षता समिती मध्ये किमान दोन शेतकरी सदस्यांचा समावेश करावा अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

नाफेड व एन सी सी एफ मार्फत होणाऱ्या कांदा खरेदीत गैरप्रकार होत असल्यामुळे महाराष्ट्र सरकारने १८ जुलै २०२५ रोजी शासन निर्णय काढून दक्षता समित्या नेमल्या होत्या. या दक्षता समित्यांनी प्रत्येक सोमवारी आपला अहवाल सादर करावयाचा होता. मात्र दक्षता समित्यांनी वेळेत अहवाल सादर न केल्यामुळे जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) फैयाज मुलानी यांनी २३ जुलै रोजी पथकासह सिन्नर येथील दोन कांदा खरेदी केंद्रांची अचानक तपासणी केली. त्यात खरेदी केलेला कांदा व प्रत्यक्षात चाळीत असलेल्या कांद्याच्या एकूण वजनात मोठी तफावत आढळून आली. ४० ते ५० टक्के कांदा ४५ एम एम पेक्षा कमी आकाराचा तसेच काजळी लागलेला आढळून आला. नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांचा कांदा खरेदी केलेला नाही. तो नाकारण्यात आला असे सांगण्यात आले असले तरी त्या बाबत काही कागदोपत्री कार्यवाही दिसत नाही. कांद्याचा आकार मोजण्यासाठी साईझर (प्रतवारी पट्टी) आढळून आलेली नाही. शेतकऱ्यांचे सात बारा उतारे व इतर आवश्यक दस्तऐवज खरेदी केंद्रावर नव्हते. एकूण, खरेदी केलेला कांदा एफ ए क्यू दर्जाचा नसून खरेदी प्रक्रियेत प्रचंड अनियमितता आहेत. शेतकऱ्यांना ऑनलाईन डी बी टी पेमेंट झाले किंवा नाही या बाबत माहिती उपलब्ध झालेली नाही. अशा अनेक त्रुटी असल्या बाबतचा अहवाल जिल्हाधिकारी नाशिक यांना २४ जुलै २०२५ रोजी देण्यात आला आहे.

### शेतकरी संघटनेच्या तक्रारीमुळे दक्षता समिती स्थापन

नाफेड व एन सी सी श्रएफ मार्फत होणाऱ्या कांदा खरेदीत मोठा घोटाळा होतो या बाबत शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाने सतत तक्रारी केल्यामुळे दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या मात्र त्यात एकही शेतकरी प्रतिनिधी नाही. शासकीय अधिकारी इतर कामात व्यस्त असल्यामुळे वेळेत तपासणी होणार नाही तसेच सरकारी कर्मचाऱ्यांवर जनतेचा विश्वास नाही म्हणून सर्व समित्यांमध्ये किमान दोन शेतकरी सदस्य असावेत अशी मागणी घनवट यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात केली आहे.

### नाफेड मार्फत हमी भावाने कांदा खरेदी?

दोन दिवसापूर्वी नाफेडच्या अधिकृत एक्स (ट्विटर) हॅण्डल वरून एक ट्विट करण्यात आला आहे की महाराष्ट्रात कांद्याची खरेदी सुरू आहे व शेतकऱ्यांकडून हमीभावाने कांदा खरेदी केला जात आहे. कांद्याला कोणताही हमीभाव नाही व दर आठवड्याला नवीन दर जाहीर केले जातात. मग हमीभावाने कांदा खरेदी केला जात आहे असे भासवून जनतेची दिशाभूल करणाऱ्या नाफेडच्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी निवेदनात केली आहे.

सर्व कांदा खरेदी केंद्रांची तातडीने चौकशी करून सदरचे अहवाल जनतेसाठी खुले करावेत व नाफेड व एन सी सी एफ मार्फत होणाऱ्या कांदा खरेदी बाबत पारदर्शकता येण्यासाठी , प्रत्येक आठवड्याला नाफेडला कांदा विकणाऱ्या शेतकऱ्यांची नावे, पत्ता, किती कांदा विकला, वाहन प्रकार व क्रमांक आदी माहिती नाफेड व एन सी सी एफ च्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करावी अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. निवेदनाच्या प्रति कृषी मंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पणन मंत्री, पणन संचालक व जिल्हाधिकारी नाशिक यांना पाठवल्या आहेत.

# शनैश्वर देवस्थानच्या आणखी एका तरुण कर्मचाऱ्याची आत्महत्या

नगर - नेवासा तालुक्यातील शनी शिंगणापूर येथील शनैश्वर देवस्थानचा कंत्राटी कर्मचारी शुभम विजय शिंदे (वय २२, रा. बेल्हेकरवाडी, ता. नेवासा) याने ३० जुलै रोजी दुपारी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. देवस्थानचे उपकार्यकारी अधिकारी नितीन शेटे यांनी २८ जुलै रोजी आत्महत्या केली. त्यानंतर ही दुसरी घटना घडली आहे.

शुभम शिंदे याचे आईवडील हे शेतात कामाला गेले होते. घराच्या वरच्या पत्र्याच्या खोलीत त्याने गळफास घेतला. शेजारील मुलांच्या निदर्शनास ही घटना आली. त्यांनी ही माहिती परिसरातील नागरिकांना सांगितली. त्यानंतर घटनास्थळी पोलिस दाखल झाले. शुभमने दुपारी ४ वाजून १५ मिनिटांपूर्वी दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. यासंदर्भात दत्तात्रय आप्पासाहेब शिंदे (रा. बेल्हेकरवाडी) यांनी सोनई पोलिस ठाण्यात खबर दिली. याबाबत सोनई पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शिंदे याच्या मृतदेहाचे नेवासा येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन झाले. उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. रात्री उशिरा बेल्हेकरवाडी येथे त्याच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

शिंगणापूर देवस्थानवर विविध घोटाळ्यांचे आरोप झाल्याने हे देवस्थान चर्चेत आहे. ही चौकशी सुरु असतानाच २८ जुलै रोजी सकाळी देवस्थ-ानचे उपकार्यकारी अधिकारी शेटे यांनी आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला. त्या आत्महत्येचे कारण अद्याप समोर आलेले नाही. शिंदे हा कर्मचारीही देवस्थानमध्ये कामाला होता. शिंदे हा देवस्थानमध्ये वॉचमन होता. तो अधिकार पदावर नव्हता. त्यामुळे इतर कारणांमुळे त्याने आत्महत्या केलेली असावी अशी चर्चा आहे.

शुभम हा त्याच्या आई-वडिलांना एकुलता होता. तसेच तो अविवाहित होता. शनिशिंगणापूर देवस्थानमध्ये तो खाजगी कंत्राटी कर्मचारी (वॉचमन) म्हणून कामाला होता. गोशाळा, मंदिर परिसर, भक्तनिवास आदी विभागात आलटून-पालटून त्याने कामे केली. सध्या दहा दिवसांपासून तो कामावर जात नव्हता. आत्महत्येबाबत अद्याप ठोस कारण मिळाले नसल्याचे पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब लबडे यांनी सांगितले.

# राज्यात १ ते ७ ऑगस्टदरम्यान महसूल सप्ताह साजरा होणार

## महसूल सेवेचे सक्षमीकरण, जनजागृती व लोकाभिमुख उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी

शिर्डी - शासनाच्या महसूल विभागामार्फत १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत राज्यभरात 'महसूल सप्ताह - २०२५' साजरा करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या योजनांची माहिती, लाभ व सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी शासनाने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिली.

सप्ताहाची सुरुवात १ ऑगस्ट रोजी 'महसूल दिना' पासून होणार असून, याप्रसंगी विभागीय व जिल्हास्तरावर महसूल खात्यातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार केला जाईल. तसेच, उत्कृष्ट कामगिरीसाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. लाभार्थ्यांना योजनांतील प्रमाणपत्रांचे वाटप, ई-हक्क पोर्टलचा वापर, ऑनलाईन सेवा राबविणे, सेतु केंद्रांमार्फत नागरिकांचे अर्ज स्वीकारणे यावर विशेष भर देण्यात येणार आहे. सप्ताहाच्या प्रत्येक दिवशी विशिष्ट उद्देश ठेवून उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

२ ऑगस्ट रोजी २०११ पूर्वीपासून शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या पात्र कुटुंबांना अधिकृत पट्टे वाटप करण्यात येतील. ग्रामसेवक व तलाठ्यांनी अशा लाभार्थ्यांची यादी तयार करून पुनर्विलोकन करावे व विभागीय मंजुरीनंतर लाभार्थ्यांना पट्टे दिले जातील.

३ ऑगस्टला शेत पाणंद व वशिरस्त्यांवरील अतिक्रमणांची मोजणी करून त्यांना मुक्त करून वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येईल. वृक्षलागवड मनरेगा, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था व शेजारी शेतकऱ्यांच्या सहभागाने केली जाईल.

४ ऑगस्ट रोजी महसूल विभागामार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' राबवले जाईल. यात विभागीय शिबिरे, विविध योजनांचे प्रमाणपत्र वितरण, जात-उत्पन्न-रहिवासी दाखले देणे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदत, तसेच घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांना जमिनीचा ताबा व मिळकत नोंद एकत्रित नावाने देण्याची कार्यवाही केली जाईल.

५ ऑगस्टला थेट लाभ हस्तांतर DBT (Direct Benefit Transfer) योजनेतील लाभ मिळाले नसलेल्या लाभार्थ्यांची घरोघरी भेट देऊन आधार, बँक लिंक, केवायसी तपासून थेट लाभ प्राप्त होईल यासाठी कार्यवाही केली जाईल.

६ ऑगस्ट रोजी, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटवणे, शर्तभंग प्रकरणांची फेरतपासणी, कूळ कायद्यानुसार लाभ मिळालेले शेतकरी, इनाम जमिनी पुनवसन आणि शेतकऱ्यांच्या नावावर ७/१२ वरुन शर्ती कमी करण्याचे काम केले जाईल.

७ ऑगस्ट रोजी शासनाच्या नवीन कृत्रिम वाळू (M-Sand) धोरणाची अंमलबजावणी, विभागीय पातळीवर कार्यशाळा, विशेष चर्चासत्रे आयोजित करून महसूल सप्ताहाचा समारोप समारंभ साजरा केला जाईल.

या संपूर्ण आठवड्यात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी, मंडळ अधिकारी व सर्व महसूल कर्मचारी नागरिकांपर्यंत महसूल सेवा पोहोचवण्यासाठी सज्ज राहतील. प्रत्येक जिल्ह्यात हेल्पडेस्क व व्हॉट्सॲप सेवा सुरू करण्यात येणार असून, नागरिकांच्या शंका व अडचणींचे निरसन तत्परतेने करण्यात येईल. शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारे व्हिडिओ, प्रसिद्धिपत्रके तयार करून वृत्तपत्रे, सोशल मिडिया व स्थानिक माध्यमांतून व्यापक प्रसिद्धी दिली जाणार आहे.

हा उपक्रम महसूल खात्याच्या पारदर्शक, सक्षम व लोकाभिमुख कार्यपद्धतीचा भाग असून, शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचा शासनाचा प्रयत्न या उपक्रमातून प्रत्यक्षात उतरणार आहे.

### जनाबाई हजारे यांचे निधन



नगर- सालेवडगाव (ता.आष्टी) येथील रहिवाशी जनाबाई संतराम हजारे (वय ९०) यांचे २८ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर सालेवडगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात ४ मुले, सूना, ४ नातवंडे, २ मूली असा परिवार आहे. रघुनाथ, बलभीम, शिवाजी तसेच महात्मा फुले पतसंस्थेचे मॅनेजर बापूसाहेब हजारे यांच्या त्या मातोश्री होत.

### राजेंद्र काळे यांचे निधन



नगर- श्रीगोंदा येथील रहिवाशी राजेंद्र तुकाराम काळे (वय ५०) यांचे ३० जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर श्रीगोंदा येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

गेल्या सहा महिन्यापूर्वी चिखली (ता.श्रीगोंदा) येथे अपघात झाल्यापासून ते कोमात होते. त्यांच्यामागे आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, असा परिवार आहे.

### इंदुमती कुदळे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील इंदुमती जगन्नाथ कुदळे (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने दुखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, दिर, सून, पुतणे, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर न.प.चे सेवानिवृत्त कॅशियर विलास कुदळे, संकेत संदेश जनरल स्टोअरचे मालक अनिल कुदळे व शेतकरी सुनील कुदळे यांच्या मातोश्री, अरविंद कुदळे यांच्या भावजई, संतोष व संजय कुदळे यांच्या चुलती होत.

# नगर-पुणे महामार्गावर एसटी बसची कारला धडक, अपघातात शिक्षकाचा मृत्यू



मनोहर काळोखे (मयत)

नगर- नगर-पुणे महामार्गावर वाघुंडे बुद्रुक गावाकडे वळताना कारला एसटी बसने जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात कारमधील मनोहर दादाभाऊ काळोखे (वय ५२, रा. पानोली) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही धडक इतकी भीषण होती, की एसटीने कारला पाठीमागून धडक दिल्यानंतर कारमधील गॅस टाकी उडून बाहेर पडली आणि तिथे उभ्या असलेल्या दुचाकीवर जाऊन आदळली. २९ जुलै रोजी सायंकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.



नगर पुणे महामार्गावर एसटी बसने दिलेल्या धडकेने कारची झालेली दुर्दशा.

मनोहर काळोखे हे त्यांच्या कारने (क्र. एमएच १६-बीएच ३३५१) पुण्याहून नगरकडे जाणाऱ्या रस्त्याने येत होते. त्यांना वाघुंडे बुद्रुककडेजायचे असल्याने त्यांनी रस्ता दुभाजकापासून कार वळविली. त्याच वेळी नगरहून पुण्याकडे भरधाव वेगाने जात असलेल्या शिंदखेडा-पुणे बसने (क्र. एमएच २०-बीएल ४१२३) कारला मागून जोराची धडक दिली. यामुळे काळोखे हे काचेवर आदळले गेले. त्यात त्यांच्या मानेला, डोक्याला जबर मार लागला.

काळोखे यांनी पुण्याकडे जाणारा रस्ता जवळपास ओलांडलाही होता. मात्र, भरधाव वेगाने आलेल्या एसटी बसच्या चालकाला अंदाज न आल्याचे कारला एसटी बसची जोराची धडक बसली. त्यात कारच्या पाठीमागच्या बाजूचा चक्काचूर झाला. जोराची धडक बसल्याने काळोखे यांचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ते कारच्या काचेवर आदळले गेले. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना स्थानिक नागरिकांनी सुपा येथील रुग्णालयात नेले, मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तेथे उपचार सुरु होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

# रस्त्यामध्ये रिक्षा उभ्या करणाऱ्या दोन रिक्षाचालकांवर गुन्हे दाखल

नगर - सार्वजनिक रस्त्यांवर वाहने पार्क करुन नागरिकांच्या सुरक्षिततेस धोका व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या दोन रिक्षाचालकांवर कोतवाली पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई कापड बाजारातील भिंगारवाला चौक आणि आशा टॉकीज चौक येथे ३० जुलै रोजी सायंकाळी केली.

पोलीस उपनिरीक्षक पडवळ व पोलीस हवालदार विजय काळे हे नगर शहरात पेट्रोलिंग करत असताना कापडबाजार, भिंगारवाला चौक येथे रस्त्याच्या मध्ये बजाज कंपनीची रिक्षा (क्र. एम एच १६ एम ९७३९) ही रस्त्याच्या मधोमध धोकादायक पद्धतीने उभी असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी रिक्षाचालक समीर गुलाब मोहम्मद बागवान (वय ४८, रा. पाचलिंब गल्ली, सारडा लेन, अ.नगर) याच्यावर गुन्हा दाखल केला. दुसऱ्या कारवाईत आशा टॉकीज समोर रस्त्याच्या मध्ये एक पॅगो ॲपे रिक्षा ( क्र. एम एच १६ सी ई १४७९) ही रस्त्याच्या मध्ये उभी केली असल्याचे आढळून आली. पोलिसांनी रिक्षा चालक भागवत गजानन शिंदे (वय ३२, रा. घर नं. २३, तपोवन रोड, ढवणवस्ती, सैनिक कॉर्नर, अ.नगर) याच्यावर गुन्हा दाखल केला.



आर्किटेक्टस् इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी अभिजित देवी, उपाध्यक्षपदी प्रदीप तांदळे तर सचिवपदी भुषण पांडव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया : लहू दळवी)

# आर्किटेक्टस् इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी अभिजित देवी

## उपाध्यक्षपदी प्रदीप तांदळे तर सचिवपदी भुषण पांडव यांची निवड







नगर – आर्किटेक्टस् इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स अहिल्यानगर यांची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी इंजि. अभिजित देवी, उपाध्यक्षपदी इंजि. प्रदीप तांदळे तर सचिवपदी इंजि. भूषण पांडव, खजिनदार इंजि. सुनिल औटी तर सह सचिवपदी इंजि. संतोष खांडेकर यांची निवड करण्यात आली. संचालक मंडळ निवडणुक प्रक्रिया नुकतीच पार पडली. त्यात संचालकपदी आदिनाथ दहिफळे, संजय चांडवले, सुनिल जाधव, सचिन डागा, जितेश सचदेव, संकेत पादिर, अनमोल जैन आणि गौरव मांड्गे यांची निवड करण्यात आली. २०२५-२६ सालासाठी झालेल्या कार्यकारिणी निवडणुकीत अध्यक्षपदी अभिजित देवी यांची बहुमताने निवड करण्यात आले तर उपाध्यक्षपदी प्रदिप तांदळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून अजित माने यांनी काम पाहिले. त्यांना विशारद पेटकर, मधुकर बालटे, नंदकिशोर घोडके, राजेंद्र पाचे, वैभव देशमुख, रवींद्र सोनावणे, चंद्रकांत तागड, मनोज जाधव, कैलास ढोरे यांनी सहकार्य केले.

यावेळी बोलताना अभिजित देवी यांनी वर्षभरात एसा भवनच्या कामास आणि सभासदांच्या शासकीय विभागात येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या कामास प्राध्यान्य देणार असल्याचे नमूद केले. त्याचबरोबर वर्षभर विविध तांत्रिक सेमिनार, प्लांट आणि साइट व्हिजिटचे आयोजन करणार असून बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड स्पर्धेचे मोठ्या स्वरूपात आयोजन करणार असल्याचे सांगितले.

इंजि. आदिनाथ दहिफळे यांनी मागील वर्षभरात केलेल्या बॉक्स क्रिकेट स्पर्धा, घटना दुरुस्ती बाबत कार्यवाही आणि मागील वर्षात आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचा आढावा घेतला तसेच सभासद हितास प्राधान्य देऊन विविध उपक्रमांचे आयोजन केल्याचे सांगितले.

वार्षिक सर्वसाधारण सभेस इक्बाल सय्यद, मकरंद देशपांडे, अनिल मुरकुटे, अन्वर शेख, रत्नाकर कुलकर्णी, अमेय कुलकर्णी, अजय दगडे, सलीम शेख, सुनिल हळगावकर, रमेश कार्ले, सुरेश परदेशी, अशोक मवाळ, एस यू खान, मिनल काळे, सुरेंद्र धर्माधिकारी, दीपक मुथा, शैलेश सप्रे, साजिद शेख, रमेश बोरुडे, अमोल येनगंदुल, प्रथमेश सोनावणे आणि सभासद उपस्थित होते.

# जहा जहा पडे कदम... वहा फिजा बदल गई....

स्वर्गीय मोहम्मद रफी



धार्मिक उत्सवाची रेलचेल असलेला पवित्र श्रावण मासाची भाविकांना जशी ओढ लागते त्याचप्रमाणे महान गायक स्वर्गीय रफी साहेबांचा स्मृतिदिन. ३१ जुलै जगभरातील रफी साहेबांचे करोडो चाहते, गायक, वादकांच्या उत्साहाला उधाण येते. रफी साहेबांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी आयोजक, गायक सर्वत्र गायनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. अहिल्यानगर मध्ये सुभाष पाटोळे, सुनील भंडारे, डॉ. काशीद, सत्तार, आंग्रे, राजकुमार वर्मा, सईद खान, अन्सार शेख, अंतरकर, अबीद दूल्हेखान, अमीन धारानी, श्रीपाद शहाणे, माळवदे आदी अनेक वर्षापासून आपल्या स्वरातून रफींची हिंदी चित्रपटातील प्रसिद्ध गाणी व मराठी भावगीत गात कार्यक्रमांचं आयोजन करत श्रोत्यांसमोर रफीच्या आठवणी जागवीत आहेत.

रफीचा स्वर अजातशत्रू, रफी एकमेव गायक आहे त्यांचा स्वर अभिनय करायचा, मधुमती.. टूटे हुए खाबो ने... दिलीप कुमार, जंगल मे मोर नाचा जॉनी वॉकर, हम काले है तो.. मेहमूद, अभी ना जाओ छोडकर.. देव आनंद, आसमान से आया फरिश्ता.. शम्मी कपूर, लिखे जो खत तुझे.. शशी कपूर, तेरी प्यारी प्यारी सुरत को.. राजेंद्र कुमार, चौदवी का चांद हो.. गुरुदत्त, मै यमला पगला दिवाना.. धर्मेंद्र, बार बार दिन ये आये.. जितेंद्र इत्यादी अनेक अनेक चित्रपटातील गाणी ऐकताना तो अभिनेता आपल्या मनात काही सेकंदात प्रतिबिंबित होतो. सुरुवातीला सुहानी रात ढल चुकी है... इक दिल के टुकडे हजार हुए.. गाणारा रफिला संगीतकार एस डी बर्मन यांनी प्यासा चित्रपटातील गाणी गाऊन घेताना त्यांचा स्वराला मोल्ड दिला. प्रचंड प्रसिद्धी, कीर्ती, पैसा, प्राप्त करू नही पाऊल मखमली गालीच्यावर नाहीतर दातृत्व, मदत, याशिवाय निष्पाप मनाचे ठसे मातीवर उमटत असत. मोहम्मद रफी च्या अनेक अनवट किस्से पैकी एक संग्राम, चित्रपटातील मै तो तेरे हंसी खयालो मे खो गया हु.. अभिनेता रंधावावर चित्रित गाण्याचे रेकॉर्डिंग संपल्यावर संगीतकार लाला असर सत्तार दिग्दर्शकाकडून पैसे न आल्याने चिंताग्रस्त झाले, काळवंडलेले चेहरे बघून अनुभवी रफी साहेबांना प्रकार लक्षात आला त्यांनी तिघांना जवळ बोलावून आपल्या खिशातील सर्व रक्कम काढून त्यांना देत म्हणाले प्रथम वादकांना पेमेंट करा आभाराची वाट न पाहता कार मध्ये बसून निघून गेले, संगीतकार अचंबित. कहानी किस्मत की चित्रपटातील किशोर कुमार आवाजातील गीत धर्मेंद्र रेखावर चित्रित रफ्ता रफ्ता ऑख मेरी लडी है... मधला मैने ऐसा तो नही कहा था... आवाज रेखाचा आहे असा गैरसमजमज अनेक सिने रसिकांचा आजही आहे, परंतु पार्श्वगायिका उषा तिमोतीनें माझे नावाचा उल्लेख कुठे करू नये अशा अटीवर रेकॉर्डिंग केले. रफी साहेबांनी गाणे ऐकताना आवाज ओळखला उषाला बोलावून त्यांनी सल्ला दिला उषा नाम होने से काम मिलता है.. सिर्फ काम मिलने से नही, आगे ऐसी गलती फिर नही करना विश्वजीत, जॉय मुखर्जी, जितेंद्र, संजय खान राजेंद्र कुमार, भारत भूषण, प्रदीप कुमार इत्यादी अनेक सिने अभिनेत्यांच्या लोकप्रियतेचे श्रेय रफी कडेच जाते. दिवस, महिने, वर्ष जातील, येथील परंतु स्वरगंगेत लता, आशा, सैगल, रफी, मुकेश, तलत, मन्ना डे आणि किशोर कुमार हे सर्व चिरंजीवी स्वर जगाच्या अंतापर्यंत स्वरेल लहरी तरंगत राहतील हे त्रिवार सत्य. - **नंदकिशोर आढाव**

सिने अभ्यासक ९८५०२५४१४३

# अहिल्यानगर शहरात २ ऑगस्ट रोजी 'आज की शाम रफी के नाम' कार्यक्रम



नगर – मागील ३५ वर्षापासून सलग मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना श्रद्धांजली कार्यक्रम करणारे संगीतप्रेमी व रफी प्रेमी सईद खान यांनी यावर्षीही मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथीनिमित्त २ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६-३० वाजता सर्जे पुरा येथील रहेमत सुलतान हॉल मध्ये आज की शाम रफी के नाम या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे सईद खान यांनी सांगितले.

या कार्यक्रमात मोहम्मद रफी यांची सदाबहार व अजरामर गीते अन्वर शेख, आबीद हुसेन, निलेश महाजन, अंजुम पटवेकर, अन्सार शेख, संजय भिंगारदिवे, मुख्तार शेख, विद्या तन्वर, ज्योती भिंगारदिवे, योगिनी अक्कडकर हे सादर करतील. तर समीर खान हे सूत्रसंचालन करणार आहे. कार्यक्रम वेळेवर सुरू होईल व सर्वांना प्रवेश विनामूल्य असल्याचे आयोजक सईद खान यांनी सांगितले. तसेच कार्यक्रमातच विशेष गुणवत्तेसह सी ए ची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल शिफा शेख अब्दुल अलीम व अमान शेख रफिक यांचा सन्मान करण्यात येईल.

संगीत प्रेमींनी या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन सईद खान यांनी केले आहे.

# राजेंद्र घोडके यांनी मिळविला १०० कि.मी. धावण्याची स्पर्धा पूर्ण करण्याचा बहुमान



आरोग्यवारी स्पर्धेत येथील राजेंद्र ऊर्फ हरिभाऊ घोडके यांनी १०० किलोमीटर धावण्याचा स्पर्धा पूर्ण करीत जिल्ह्यात पहिल्यांदा हा बहुमान मिळविला.

नगर – उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित (आरोग्यवारी २०२५) स्पर्धेत येथील राजेंद्र ऊर्फ हरिभाऊ घोडके यांनी १०० किलोमीटर धावण्याचा स्पर्धा पूर्ण करीत जिल्ह्यात पहिल्यांदा हा बहुमान मिळविला. श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिर पुणे ते बारामती असा १०० किलोमीटर अशा खुल्या गटात ८५ स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेदरम्यान जेजुरी, मोरगाव, दिवे घाटातील चढ-उतार व कशाचीच पर्वा न करता राजेंद्र घोडके यांनी स्पर्धा यशस्वीतेने पूर्ण केली.

श्री. घोडके अहिल्यानगर जिल्ह्यातील उत्कृष्ट धावपटू आहेत. त्यांनी यापूर्वी मुंबई टाटा मॅरेथॉन ४२ कि.मी २ वेळा, लोणावळा अल्ट्रा मॅरेथॉन ५० कि.मी. २ वेळा, सातारा हिल मॅरेथॉन २१ कि.मी. २ वेळा, तसेच खडकवासला अल्ट्रा मॅरेथॉन ५६ कि.मी., गणपतीपुळे ५६ किलोमीटर, कास अल्ट्रा मॅरेथॉन ६५ कि.मी., बारामती पावर मॅरेथॉन ४२ कि.मी., आपले पुणे ३५ कि.मी व ४२ कि.मी, अहिल्यानगर ते पंढरपूर रिले रन वारी २०२५, अहिल्यानगर ते पंढरपूर सायकल वारी २०२४, हिस्टॉरिकल मॅरेथॉन व नगर रायझिंग मॅरेथॉन २१ कि.मी. अशा विविध स्पर्धांत यश मिळविले आहे.

श्री. घोडके रिअल इस्टेट व्यवसायात आहेत. डायबिटीस असून देखील त्यांनी हे यश मिळवून डायबिटीस पेशंट व इतरांना प्रेरणादायी ठरत आहेत. तालुक्यातील घोसपुरी येथे ते वास्तव्यास आहेत. त्यांना हरिष काबरा, अनुपम संकलेचा, ललित लुणिया यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# करिअर कट्टा विद्यार्थ्यांच्या करिअरच्या संधीचा 'समृद्धी महामार्ग'

## यशवंत शितोळे यांचे प्रतिपादन



अहमदनगर महाविद्यालयामध्ये 'करिअर कट्टा' कार्यक्रमामध्ये यशवंत शितोळे.

## अहमदनगर महाविद्यालयात 'करिअर कट्टा' अंतर्गत विद्यार्थी संवाद कार्यक्रम

नगर – विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ मनोरंजनापुरता न करता तो शिक्षण, संवाद आणि करिअर उभारणीसाठी साधन म्हणून केला, तर करिअरच्या संधी आपोआप वाढतील, असे प्रतिपादन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी केले.

भा.पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे अहमदनगर महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री. शितोळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते.

शितोळे पुढे म्हणाले, आजचे विद्यार्थी मोबाईलचा वापर फक्त मनोरंजनासाठी करतात. मात्र, मोबाईल वापरण्याची संस्कारशील आचारसंहिता अंगीकारणे गरजेचे आहे. गुगल मिट, झूम, व्हॉट्सॲप, टेलिग्राम यांसारख्या साधनांचा सुसंस्कृत संवादासाठी वापर करावा. ट्रोलिंग, अपशब्द, धमक्या व अपमानास्पद भाषा टाळावी. मोबाईलचा वापर ग्राहक म्हणून न करता जागरूक वापरकर्ता म्हणून करणे आवश्यक आहे. करिअर कट्टा या उपक्रमातून आतापर्यंत तब्बल २५०० विद्यार्थी स्पर्धा परीक्षांद्वारे यशस्वी होऊन विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. अनेक विद्यार्थी यशस्वी उद्योजकही झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरण्याची पद्धत बदलली, तर करिअरची संधी आपोआप निर्माण होईल आणि 'करिअर कट्टा' हा विद्यार्थ्यांसाठी करिअरचा 'समृद्धी महामार्ग' ठरेल.

कार्यक्रमानंतर श्री. शितोळे यांनी जिल्हा करिअर संसदेतील पदाधिकाऱ्यांनाही मार्गदर्शन केले. या प्रसंगी सारडा महाविद्यालय अहिल्यानगर, दादा पाटील राजळे महाविद्यालय अदिनाथ नगर आणि अहमदनगर महाविद्यालय येथील करिअर संसद पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्राचार्य प्रवर्तक डॉ. राजधर टेमकर (दादा पाटील राजळे महाविद्यालय, अदिनाथनगर), छत्रपती महाविद्यालय श्रीगोंदा यांचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, सारडा महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. प्रसाद तांबे, डॉ. विलास सुद्रिक आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा समन्वयक (दक्षिण) प्रा. डॉ. भागवत परकाळ यांनी केले. सूत्रसंचालन शिवानी मुठे हिने केले. नम्रता सिंग यांनी आभार मानले. श्रद्धा गायकवाड, हर्षिता रवारीया, रोहित मुथा, शेख शफक, खान शीफा आणि अर्जुन गहिले यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. तसेच उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. सय्यद रज्जाक, डॉ. प्रितमकुमार बेदरकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे, प्राध्यापकवर्ग आणि श्रीमती काल्पलता भिंगारदिवे यांचे सहकार्य लाभले.




वेस्ट झोन आईसस्टॉक स्पर्धेत चमकलेले चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे खेळाडू प्रशिक्षकांसमवेत.

# चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे खेळाडू वेस्ट झोन आईसस्टॉक स्पर्धेत चमकले

## राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

नगर – कोल्हापूर येथे पार पडलेल्या वेस्ट झोन आईसस्टॉक स्पर्धेत अहमदनगरच्या चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करून नगरचे नाव अभिमानाने उंचावले. प्रभावी खेळ व सातत्यपूर्ण प्रदर्शनामुळे या शाळेतील संकल्प खंडिझोड, क्रिश शहा आणि हेमंत चौधरी या तिघांची येत्या सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय आईसस्टॉक स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अरुणोदय क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे संचालक महेश आनंदकर, तसेच शाळेचे क्रीडा शिक्षक ऋषीकेश घोडेकर व स्टीफन डिसुझा यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी सराव करत आपली कौशल्ये पैलू पाडली.

या यशाबद्दल शाळेचे संस्थापक संजय चव्हाण आणि प्राचार्य अशोक सचदेव यांनी खेळाडूंना अभिनंदनाचा वर्षाव केला. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासाबरोबरच खेळांनाही प्राधान्य दिल्यास व्यक्तिमत्त्व सर्वांगीण घडते. सराव, शिस्त आणि समर्पण हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे, असे ते म्हणाले.

स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश आणि दीव-दमण या राज्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. आईसस्टॉक हा खेळ भारतीय ऑलिम्पिक महासंघाने मान्यताप्राप्त असून, 'खेलो इंडिया', विंटर गेम्स व ऑल इंडिया पोलिस गेम्समध्येही त्याचा समावेश आहे.



साईदीप हिरोज चॅम्पियन चषकचा विजेता ठरलेल्या मराठा वॉरियर्स क्रिकेट संघाचे खेळाडू. (छाया : लहू दळवी)

# साईदीप हिरोज चॅम्पियन चषक २०२५ चा मराठा वॉरियर्स क्रिकेट संघ ठरला विजेता

नगर – साईदीप हिरोज क्रिकेट अकॅडमीतर्फे १९ वर्षाखालील व खुल्या गटातील खेळाडूंसाठी साईदीप हिरोज चॅम्पियन चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन वाकोडी येथील मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये आठ संघाने सहभाग घेतला होता. ही स्पर्धा साखळी पद्धतीने खेळवण्यात आली. साईदीप हिरोज चॅम्पियन चषक २०२५ चा विजेता मराठा वॉरियर्स क्रिकेट संघ ठरला आहे. उपविजेता शिवराज वॉरियर्स, तृतीय विजेता युनायटेड क्रिकेट क्लब तर उत्तेजनार्थ समर्थ क्रिकेट ॲकॅडमी संघ ठरला आहे. फायनल मॅचचा मॅन ऑफ द मॅच मनीष यादव, उत्कृष्ट खेळाडू प्रलय सुरवाल, या स्पर्धेचा मॅन ऑफ द सिरीज सॅव्हीओ दुशिंग तर बेस्ट बॅट्समन राघव नाईक, बेस्ट स्पिनर बॉलर देवव्रत खोसे, फर्स्ट बॉलर ऋषिकेश सुंबे, उत्कृष्ट फील्डर हमजा सय्यद, उत्कृष्ट विकेट कीपर कवीश बडेरा ठरले आहे.

पारितोषिक वितरण करताना संदीप घोडके, परेश रासकर, राजू शेख, स्वप्नील मिरपगारे, मराठा वारियर्स संघ चालक करण भोगाडे, सागर बनसोडे, मिनीनाथ गाडीलकर, प्रशांत शेरकर, तेजस करमरकर, मेजर राम हाके, आदीसह खेळाडू उपस्थित होते.

यावेळी संदीप घोडके म्हणाले की विद्यार्थ्यांनी शालेय जीवनामध्येच क्रिकेट खेळाचे धडे घ्यावेत. जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश संपादन करता येत असते. स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूला हक्काचे व्यासपीठ निर्माण होत आहे. क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून चांगला खेळाडू निर्माण होत असतो. वाकोडी येथील साईदीप क्रिकेट मैदानावर खेळाडूंसाठी वर्षभर विविध स्पर्धेचे आयोजन केले जाते असे ते म्हणाले.

# अहिल्यानगरच्या अक्षय भापकर यांची कर्तबगारी, १९,९५१ फूट उंच माउंट शिनकुन शिखर केले सर



१९,९५१ फूट उंच माउंट शिनकुन शिखर सर करणाऱ्या अक्षय भापकर भारतीय तिरंगा ध्वजासह.

नगर – हिमालयातील बर्फाच्छादित शिखरे गिर्यारोहकांना नेहमीच नवे आव्हान देतात. तीव्र चढाई, विरळ प्राणवायू, थंडगार तापमान आणि अचानक बदलणारे हवामान यामुळे ही शिखरे सर करणे सोपे नाही. मात्र या सर्व अडथळ्यांवर मात करत अहिल्यानगर येथील ट्रेकयात्री गिर्यारोहण संस्थेचे गिर्यारोहक अक्षय भापकर यांनी तब्बल १९,९५१ फूट (६,०८१ मीटर) उंचीचे माऊंट शिनकुन यशस्वीरित्या सर करत नगरवासीयांचे नाव उंचावले आहे.

भापकर यांनी या मोहिमेपूर्वी गिर्यारोहणाचे तांत्रिक प्रशिक्षण घेतले. तसेच धावणे, वजन पाठीवर घेऊन सह्याद्रीतील डोंगर चढणे, कठोर शारीरिक सराव अशा तयारीनंतर त्यांनी हे आव्हान स्वीकारले. याआधी त्यांनी माऊंट युनाम (६,१११ मीटर) हे शिखरही सर केले आहे.

ही मोहिम २० जुलै रोजी झंस्कार-जिस्पा येथून सुरू झाली. २२ जुलैला पथक बेस कॅम्पवर पोहोचले आणि २५ जुलै रोजी सकाळी ९ वाजता गिर्यारोहकांनी शिखर सर करत शिनकुनच्या शिखरावर तिरंगा फडकावला. पथकात अक्षय भापकर यांच्यासह अंकित सोहोनी, कुशल मासाळ, आनंद चिनूरकर, संपत मालू, नमिता शेळके, डॉ. सुनीता राठी आणि गिर्यारोहक संघाचे प्रमुख डॉ. सुमित मांदळे यांचा समावेश होता.

लाहौल-स्पीती व जम्मू-काश्मीर सीमेवर वसलेले माऊंट शिनकुन हे तांत्रिकदृष्ट्या अवघड शिखर मानले जाते. पथकाने पूर्वेकडील कठीण बाजूने ही चढाई पार केली, अशी माहिती डॉ. मांदळे यांनी दिली.

अक्षय भापकर यांच्या या यशाबद्दल ट्रेकयात्री गिर्यारोहण संस्थेचे गिर्यारोहक रविंद्र चोभे, अमित सोनग्रा आणि आकाश पातकळ यांनी त्यांचा सत्कार केला. भापकर यांचे हे यश स्थानिक गिर्यारोहण क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



डॉ. बाळासाहेब खोमणे यांना आंतरराष्ट्रीय व्यवसाय उत्कृष्टता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय व्यवसाय उत्कृष्टता पुरस्काराने 'प्रियदर्शनी'चे बाळासाहेब खोमणे सन्मानित

नगर – प्रियदर्शनी पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ही संस्था अहिल्यानगर भिंगार येथील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्यासाठी उभारण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील दूरदृष्टी, व्यवस्थापनातील सर्वांगीण विकासासाठी, शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा ध्यास त्यांनी घेतला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था ग्रामीण व शहरी भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा वटवृक्षाला २५ वर्ष यशस्वीरित्या पूर्ण केले. याची दखल आंतरराष्ट्रीय संस्था ग्लोबल बिझनेस फोरम यांनी घेऊन शाळेचे संस्थापक बाळासाहेब मधुकर खोमणे यांना व्यवसायिक उत्कृष्टता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा गौरवप्राप्त सोहळा थायलंड येथे २५ जुलै रोजी पार पडला.

# स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर एक दिवसाचे संसदेचे अधिवेशन घ्यावे

## खासदार निलेश लंके यांची संसदेत मागणी



संसदेच्या पावसाळी अधिवेशनात बोलताना खा.निलेश लंके.

नगर – संसदेच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात खासदार निलेश लंके यांनी एक ऐतिहासिक आणि जाज्वल्य मागणी मांडून संसदेत उपस्थितांचे लक्ष वेधले. अखंड हिंदुस्तानचे राजे म्हणून गौरवले जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा आणि त्यांच्या अष्टप्रधान मंडळाच्या स्थापनेचा ऐतिहासिक संदर्भ देत, लंके यांनी रायगड किल्ल्यावर एक दिवसाचे संसदेचे अधिवेशन आयोजित करण्याची मागणी केली.

खासदार लंके म्हणाले, ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगडावर राज्याभिषेक झाला. हा क्षण केवळ स्वराज्याची स्थापना नव्हे, तर लोकशाही मूल्यांची मूळ जडणघडण होता. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून महाराजांनी स्वतंत्र खात्यांचे मंत्री नेमले, आणि न्याय, समता, बंधुता व स्वातंत्र्य यांना मूर्त रूप दिलं. जेव्हा संपूर्ण जग हुकूमशाहीत बुडालं होतं, तेव्हा शिवराज्य लोकशाहीचा दीप घेऊन उभं होतं.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या या अद्वितीय वैचारिक वारशाचा गौरव करण्यासाठी, आणि आजच्या लोकशाही व्यवस्थेला त्या मुळांशी पुन्हा जोडण्यासाठी, रायगड किल्ल्यावर एक विशेष संसदीय अधिवेशन घेण्याची मागणी ही केवळ ऐतिहासिक न्याय नाही, तर प्रेरणादायीही ठरेल, असे लंके यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर समाजसुधारकांनी शिवाजी महाराजांच्या विचारसरणीवर चालत महाराष्ट्र आणि देशभर सामाजिक क्रांती घडवून आणली. त्यामुळे रायगडावर संसद भरवणं हे त्यांच्या आणि आपल्या लोकशाही व्यवस्थेच्या मुळाशी नतमस्तक होणं ठरेल. असेही खा. लंके म्हणाले.

# नेहरु मार्केटच्या मूळ गाळेधारकांना लिलाव न करता पूर्वीप्रमाणेच भाडे तत्वावर गाळे द्यावे

## सत्याच्या बाजूने उभे राहण्यासाठी आयुक्तांना गाळेधारकांच्या वतीने भगवत गीतेचा ग्रंथ भेट



नेहरु मार्केट गाळेधारक युनियनचे अध्यक्ष संजय झिंजे यांच्या नेतृत्वाखाली मूळ गाळे धारकांच्या शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन सत्याच्या बाजूने उभे राहण्यासाठी भगवत गीतेचा ग्रंथ भेट देण्यात आला.

## नेहरु मार्केट गाळेधारक युनियनच्या शिष्टमंडळाने घेतली आयुक्तांची भेट

नगर – नेहरु मार्केटच्या प्रास्तावित संकुलात मूळ गाळेधारक व ओटेवाल्यांना लिलाव न करता पूर्वीप्रमाणेच भाडे तत्वावर गाळे देण्याची मागणी नेहरु मार्केट गाळेधारक युनियन व सर्व गाळेधारकांच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नेहरु मार्केट गाळेधारक युनियनचे अध्यक्ष संजय झिंजे यांच्या नेतृत्वाखाली मूळ गाळे धारकांच्या शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन सत्याच्या बाजूने उभे राहण्यासाठी भगवत गीतेचा ग्रंथ भेट देण्यात आला. यावेळी बालाजी गौरी, पवन खेतमाळस, रुपेश तरोटे, रत्नाकर डोळसे, राजेंद्र चौधरी, सुनंदा ताठे, वसंत गुगळे, रत्नाकर डोळसे, राम खेतमाळस, वसंत गुगळे, अजय झिंजे आदी उपस्थित होते.

तब्बल १३ वर्षांपासून चितळे रोड वरील नेहरू मार्केटच्या मोकळ्या जागेच्या विकासाचा विषय प्रलंबित होता. महापालिकेने या जागेत भाजी मार्केटसह भव्य संकुल उभारण्याचा निर्णय घेतलेला आहे. यासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामही लवकरच सुरू होणार आहे. हा महत्त्वाचा विषय मार्गी लावल्याबद्दल आयुक्त डांगे यांचे सर्व गाळेधारक व युनियनच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

मूळ भाडेकरूंना या कामामुळे मोठा दिलासा मिळणार असून, त्यांची १३ वर्षाची प्रतीक्षा संपुष्टात येणार आहे. १३ वर्षांपूर्वी नेहरू मार्केटची जागा संकुल उभारणीसाठी जमीनदोस्त करण्यात आली. तत्कालीन आयुक्तांनी वर्षभरात संकुल उभारून मूळ ओटेवाले गाळेधारकांना तिथेच जागा देण्याचे आश्वासन दिले होते. महापालिकेने उच्च न्यायालयात तसे लेखी सुद्धा दिलेले आहे. त्यानुसार आता प्रत्यक्ष संकुल उभे राहत असताना त्यावेळीचे ७२ ओटेधारक भाजी विक्रेते, १२ गाळेधारक व ३ कराराने दिलेल्या मोकळ्या जागा या सर्व भाडेकरुंना नवीन संकुलात कोणत्याही लिलाव पध्दतीचे बंधन न ठेवता त्यांच्या हक्कानुसार पूर्वीप्रमाणेच भाडेतत्वावर प्रथम प्राधान्याने देण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्व ओटे व गाळ्यांचा लिलाव केल्यास गोरगरीब मूळ ओटेधारक, गाळेधारकांना आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे गाळे घेणे शक्य होणार नाही. जर सर्व ओटे व गाळ्यांचा लिलाव केल्यास या प्रक्रियेत राजकीय मंडळी, कार्यकर्ते, गुंड प्रवृत्तीचे लोक, धनिक मंडळी लिलावात सदर गाळे घेऊन तिथे अन्य व्यवसाय सुरू करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी मूळ भाजी मार्केटचा उद्देश कदापि साध्य होणार नाही. भाडेतत्वावर ओटे व गाळे न मिळल्यास भाजीविक्रेत्यांना नाईलाजाने पुन्हा रस्त्यावर बसून व्यवसाय करावा लागेल. त्यामुळे अतिशय संवेदनशीलपणे सर्वसामान्य गोरगरीब ओटे व गाळेधारकांना त्यांचा हक्क मिळवून देण्याचे निवेदनात म्हटले आहे.

तत्कालीन नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शीकर यांनी दूरदृष्टीने सर्वसामान्यसाठी नेहरू मार्केटची उभारणी सर्वसामान्यांच्या व्यापार व लोकहितासाठी केली होती. आताही महापालिका जनतेच्या करातून मिळालेल्या उत्पन्नातून संकुल उभारत आहे. त्यामुळे या संकुलाचा उद्देश कमर्शियल न ठेवता लोकहिताचा असला पाहिजे. ज्या कुशलतेने संकुल उभारणीचे काम मार्गी लावले आहे. त्याच कुशलतेने मूळ भाडेकरू असलेल्या ओटेधारक, गाळेधारकांना जागा दिली पाहिजे. कारण गाळे पाडतानाच त्यांना आश्वासन देण्यात आलेले असल्याची भावना युनियनच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. तसेच जागेची खाजगी मोजणी न करता, सरकारी मोजणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### अन्यथा पुन्हा न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागेल : संजय झिंजे

भगवत गीतेमध्ये श्रीकृष्ण हे सत्याच्या बाजूने उभे राहिले होते. नेहरु मार्केटच्या प्रश्नात आयुक्तांनी देखील मूळ गाळेधारक व ओटेवाल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सत्याच्या बाजूने उभे रहावे. यासाठी त्यांना भगवत गीतेचा ग्रंथ देण्यात आला आहे. मूळ गाळेधारक व ओटेवाले सर्व गोरगरीब असून, त्यांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे जागा उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा पुन्हा न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागणार असल्याचे संजय झिंजे यांनी म्हटले आहे.



महापालिकेच्या नियोजन शून्य कारभारामुळे प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिग साठल्याच्या निषेधार्थ डॉ. सागर बोरुडे यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेवर डस्टबिन मोर्चा काढण्यात आला. (छाया : लहू दळवी)

# कचरा व लाईटचा प्रश्न ८ दिवसात मार्गी लावा अन्यथा महानगरपालिका आयुक्तांच्या दालनात कचरा टाकणार

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रशासनाचा नियोजन शून्य कारभारामुळे नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. प्रभाग क्रमांक १ व ७ मध्ये कचऱ्याचा प्रश्न एवढा गंभीर बनला आहे की, सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य दिसत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. घंटागाडी येत नसल्यामुळे नागरिकांच्या घरात देखील डस्टबिन मध्ये कचरा साठवून ठेवले असल्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. शहरातील रस्ते अक्षरशा कचऱ्याच्या ढिगाने ओसांडून दिसत आहे. एकीकडे महापालिका स्वच्छतेबाबत जाहिरात करत आपल्या शहराला देशात पाचवा क्रमांक मिळाला आहे. आमचे पाहुणे म्हणत आहे की, आम्हाला तुमचे शहर पाहायचे आहे, आम्ही त्यांना काय सांगू? नागरिक आपला कर भरत असून महानगरपालिकेने देखील नागरिकांचे प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. येत्या ८ दिवसात प्रभागातील कचरा व लाईटचा प्रश्न मार्गी न लागल्यास, महापालिकेमध्ये आयुक्त यांच्या दालनात कचरा आणून टाकला जाईल, असा इशारा माजी नगरसेवक डॉक्टर सागर बोरुडे यांनी दिला.

महापालिकेच्या नियोजन शून्य कारभारामुळे प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिग साठल्याच्या निषेधार्थ डॉ. सागर बोरुडे यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेवर डस्टबिन मोर्चा काढण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षा आशाताई निंबाळकर, हेमलता कांबळे, वैशाली राजहंस, रोहिणी अंकुश, सुरेखा फुलपगार, सुनंदा शिरवाळे, पुष्पा राऊत, सुरज पाचारणे, आदित्य काकडे, रितेश रोकडे, अक्षय वाणी, युवराज भापकर, राहुल कातोरे, विनोद जोंधळे, शुभम ताठे, अमोल गव्हाणे, प्रवीण बडे, रोहित बारवकर, आदित्य अडसुरे, गौरव मोरे, राहुल कातोरे, अनिता भोसले, अशा गायकवाड, सुनंदा सरोदे, प्रिया गायकवाड आदी उपस्थित होते.

आशा निंबाळकर म्हणाल्या की, स्वच्छतेचा प्रश्न एवढा मोठा गंभीर असून देखील तो सोडविला जात नाही, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नागरिकांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे, नागरिकांचे जर मूलभूत प्रश्न सोडवले जात नसतील तर या प्रशासनाचे करायचे तरी काय नागरिकांच्या घरात चार चार पाच पाच डस्टबिन भर कचरा साठविला जात आहे, त्यामुळे दुर्गंधी पसरली जाते त्यामुळे कुटुंबातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, येत्या ८ दिवसात कचऱ्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास महापालिकेमध्ये तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असे त्या म्हणाल्या.

# भिंगारमध्ये सर्व एसटी गाड्यांना थांबा देण्याचे विभाग नियंत्रक अधिकाऱ्यांनी दिले आदेश

## भाजपाच्या भिंगार मंडलाच्या पाठपुराव्याला यश

नगर – भिंगार शहरातून जाणाऱ्या सर्व एसटी बस गाड्यांना भिंगारमध्ये थांबा देण्याचे आदेश विभाग नियंत्रक अधिकाऱ्यांनी दिले आहेत. तसेच भिंगार येथील बसस्थानकाच्या दुरुस्तीसाठी विभागीय स्थापत्य अधिकाऱ्यांना कळविण्यात आले असल्याचे लेखी पत्र अहिल्यानगर विभाग नियंत्रक अधिकारी यांनी भिंगार भाजपाचे मंडल अध्यक्ष सचिन जाधव यांना दिले आहे. भिंगार मंडलाच्या पाठपुराव्यास यश आले असून सर्व एसटी गाड्या आता भिंगार स्थानकात थांबत आहेत.

भिंगार मंडलाच्या वतीने भिंगार शहरातून जाणाऱ्या एसटी बस गाड्या भिंगारमध्ये थांबात नसल्याने प्रवाश्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे निवेदन काही दिवसांपूर्वी अहिल्यानगर विभाग नियंत्रक अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. या निवेदनाची दखल घेऊन राज्य परिवहन विभाग नियंत्रक अधिकारी यांनी आदेश दिले आहेत. या पत्रात नमूद केले आहे की, भिंगार मार्गे जाणाऱ्या सर्व एसटी गाड्या भिंगार बसस्थानकात जाऊन प्रवासी चढ–उतार करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे. अहिल्यानगर पाथर्डी व अहिल्यानगर शेवगाव या मार्गावरील भिंगार मार्गे जाणाऱ्या सर्व बसेस जाता येता भिंगार येथे थांबवून प्रवासी चढ–उतार करण्याच्या सूचना करण्यात येत आहेत. प्रवाशांची विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता सर्व वाहक व चालकांनी घ्यावी, असे आदेश दिले आहेत.

याबाबत मंडल अध्यक्ष सचिन जाधव यांनी विभाग नियंत्रक अधिकाऱ्यांचे आभार मानले. भिंगार बसस्थानकाचे दुरुस्तीचे काम लवकरात लवकर काम हाती घेऊन प्रवाश्यांना चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# आदर्शवत काम करणारा रोटरी प्रियदर्शनी हा महिलांचा एकमेव क्लब

## रश्मी कुलकर्णी यांचे प्रतिपादन




रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या अध्यक्षा अनुराधा आठरे व सचिव आश्लेषा भांडारकर यांनी रोटरी डिस्ट्रिक्टच्या माजी प्रांतपाल रश्मी कुलकर्णी यांच्या उपस्थितीत पदभार स्वीकारला. समवेत मधुरा झावरे, मीनल बोरा व स्वाती गुंदेचा, प्रभा खंडेलवाल आदी.

## रोटरी प्रियदर्शनी क्लबच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ उत्साहात

नगर – शहरात रोटरी क्लब प्रियदर्शनी उत्कृष्ट काम करत लोकाभिमुख उपक्रम राबवत आहे. असे आदर्शवत काम करणारा हा महिलांचा एकमेव क्लब आहे. क्लबचा सर्व कारभार महिलांच्या हाती असूनही रोटरीच्या कोणत्याही कामात मागे न रहात वेगळी प्रतिष्ठा मिळवली आहे. प्रियदर्शनीच्या या चांगल्या कार्यात महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन रोटरी क्लबच्या माजी प्रांतपाल रश्मी कुलकर्णी यांनी केले.

अहिल्यानगरच्या रोटरी क्लब प्रियदर्शनी या महिला सदस्या असलेल्या क्लबच्या अध्यक्षपदी अनुराधा आठरे व सचिवपदी आश्लेषा भांडारकर यांची निवड झाली आहे. त्यांनी आपला पदाचा पदभार नुकताच रश्मी कुलकर्णी यांच्या उपस्थितीत घेतला. यावेळी मीनल बोरा व स्वाती गुंदेचा यांनी अनुराधा आठरे व आश्लेषा भांडारकर यांना पदभार दिला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या रोटरीच्या सहाय्यक प्रांतपाल मधुरा झावरे यांच्यासह अहिल्यानगर मधील क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

मधुरा झावरे यांनी प्रांतपाल सुधीर लातुरे यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. त्या म्हणल्या, क्लब महिलांना उत्साहित करून त्यांचा समाजिक कार्यात सहभाग वाढवत आहे. आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवत आदर्शवत काम महिला सदस्या करत आहेत.

अनुराधा आठरे म्हणाल्या, कुटुंबाकडून मिळालेला सामाजिक, शैक्षणिक कामाचा वारसा मी पुढे नेत आहे. समाज सेवेसाठी उत्कृष्ट योगदान देणाऱ्या रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी सचोटीने निभावणार आहे. येणाऱ्या वर्षांत २ हजार विद्यार्थिनींचे कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण करणार आहे. तसेच रक्तदान शिबीर, जलसंधारण उपक्रमांच्या माध्यमातून रोटरी क्लबचे कार्य अधिक वाढवणार आहे.

आश्लेषा भांडारकर यांनी आभार मानले. देविका रेळे व माधुरी सारडा यांनी सूत्रसंचालन केले. प्रतिभा धूत व सहकाऱ्यांनी प्रियदर्शनी गीत सादर केले. लता भगत, सविता काळे, ममता डुंगरवाल यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. यावेळी छाया फिरोदिया, आशा फिरोदीया, गीता गिल्डा, कविता काणे, यास्मिन जालनावाला, कुंदा हळबे, शुभा बोगावत, नीना मोरे, नीलमणी गांधी, प्रभा खंडेलवाल, प्रमोद पारीख, शिरीष रायते, निलेश वैकर, हरिष नय्यर, मनीष बोरा, पुरुषोत्तम जाधव, अजय पिसुटे, ईश्वर उपस्थित होते.



भिंगार परिसरात तालुका पोलीस स्टेशन परिसरातील दत्त मंदिराजवळ कोब्रा जातीचा नाग पकडून त्याबद्दजल सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते व नागरिकांना या सर्पाबद्दल माहिती दिली. व वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश टीलोरे व वनरक्षक खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली निसर्गात मुक्तता केली. यावेळी स्वप्निल सातकर, ओम जंगम आदी उपस्थित होते. सर्प आढळल्यास मो. ९३७००७५५५५ / ९६६५०७५५५५ कृष्णा पाटील बेरड यांना संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकतीबाबत शौकत इस्माईल खान पटेल यांनी अहमदनगर येथील मे. सिव्हील जज्ञ साहेब, सि.डी. अ.नगर यांचे न्यायालयात रे.मु.नं.५५७/२०१६ चा दावा मुख्तार खान इस्माईल खान पटेल व सौ.आजरा मुख्तारखान पटेल यांचे विरुध्द दावा मिळकतीचे खरेदीखत करुन मिळणेसाठी, निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केला होता व आहे. सदरील दाव्यातील वादी शौकत इस्माईल खान पटेल हे मयत झाले असून त्यांचे वारस सफिया बानो शौकात खान पटेल व इतर हे रेकॉर्डवर आले आहेत. तसेच प्रतिवादी मुख्तार खान इस्माईल खान पटेल हे देखील मयत झाले असून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यात आले आहेत. सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित आहे.

सदर दावा चालु असतांना दाव्यातील प्रतिवादी आजरा मुख्तार खान पटेल, नवीद मुख्तार खान पटेल, निशाद मुख्तार खान पटेल, शिरल मुख्तार खान पटेल,नेहाल मुख्तार खान पटेल/नेहाल समी सय्यद हे दावा मिळकतीस त्यांचे नावाचा गैरफायदा घेऊन दावा मिळकत विक्री/हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलांना (दाव्यातील वादी) खात्रीलायक समजले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे मे. दिवाणी न्यायालय, अ.नगर या न्यायालयात दाव्याचे कामकाज न्यायप्रविष्ठ असून त्यांचे कामकाज चालु आहे. त्यामुळे वर नमुद इसमांचे बरोबर परिशिष्टात नमुद मिळकत ही आमचे अशिलांचे (दाव्यातील वादी) ताब्यात होती व आहे सबब सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारे खरेदी विक्रीचा, हस्तांतराचा अगर इतर कोणताही व्यवहार करु नये, कोणत्याही प्रकारे साठेखत, खरेदीखत, मुखत्यार, करार, हस्तांतर, लीज, इ.चा दस्त, व्यवहार करु नये. तसे केल्यास निष्कारण कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल. तसेच खरेदी घेणार अगर व्यवहार करणारास कोणतेही कायदेशीर हक्क प्राप्त होणार नाही व ते आमचे अशिल (दाव्यातील वादी) यांचेवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत. कोणाचीही कोणतीही फसवणूक होऊ नये म्हणून मुद्दामहून सदरची सदर जाहीर नोटीस दिली आहे.

**परिशिष्ठ 'अ'**

**मिळकतीचे वर्णन** :–डि ।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील नगर शहर झेंडीगेट भागातील अ) सिटी सर्व्हे नं.१८३८ ए/१ चा घर नं.१६९१/१७०२ चे क्षेत्र २१५.६५ चौ.मी. यासी चतु:सिमा पुर्वेस –सि.स.क्र.१८३८ ब, दक्षिणेस–वाग व वहीवाट, पश्चिमेस–सि.स.क्र.१८३२, उत्तरेस–वाग व वहिवाट येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत.

ब) सिटी सर्व्हे नं.१८३८ ब चा घर नं.१६९१/१७०२ चे क्षेत्र ८५.७० चौ.मी. यासी चतु:सिमा पुर्वेस –सि.स.क्र.१८३९, दक्षिणेस–वाग व वहीवाट, पश्चिमेस–सि.स.क्र.१८३८अ, उत्तरेस– सि.स.क्र.१८४० येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत त्यामधील तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे व इतर हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.

कळावे,

ॲडव्होकेट
**शाहीद शौकत खान**
वकील कक्ष क्र.१, जिल्हा न्यायालय इमारत, अहिल्यानगर, मो.नं. ८४४६४६१७३६

दि. ३१/०७/२०२५.
अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत जमिन मिळकत ही विद्यमान मालक पुनीत ओमप्रकाश भुटाणी रा. सावेडी, अहिल्यानगर यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. त्याअन्वये विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी बोलणी केली असून आमच्या अशिलाकडून सदर विसारपोटी रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीबाबत कोणतेही **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणून दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :– डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी ग्रामपंचायत हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे निमगाव घाणा** येथील गट नं. १३३/१ याचे क्षेत्र १ हे. ४८ आर.+पो. ख. ०हे. १५ आर. असे एकुण क्षेत्र १ हे. ६३ आर. याचा आकार ० रु.६९ पै. **हे संपुर्ण क्षेत्र.**

**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :–**

पूर्व :– गट नं. १५९, दक्षिण :– गट नं. १६१,
पश्चिम :– रस्ता, उत्तर :– गट नं.१३४,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडित मोरे**
मो. नं. ९८६०६४६४६३
ऑफिस : महालक्ष्मी चेंबर्स, मोरया मंगल कार्यालयासमोर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर.

अहिल्यानगर
दिनांक – ३१/०७/२०२५

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **अब्दुल समद मोहम्मद सादिक शेख रा. इदगाह मैदान, कामाठीपुरा, झेंडीगेट, अहिल्यानगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन सदरची मिळकत विक्री करण्याचे करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असून साठेखतापोटी विसार म्हणून आमचे आशिलाकडुन मोठी रक्कम देखील घेतलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, वारस, वहिवाट,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे आत** खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, तसेच सदर पुराव्यावर आमची समज म्हणुन सही घ्यावी. जर मुदतीत कोणाचेही कोणतेही प्रकारची हरकत व तक्रार न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन**:– जिल्हा तुकडी अहिल्यानगर/अहमदनगर पो. तु.ता.नगर पैकी, अहिल्यानगर येथील अहिल्यानगर/अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर अहिल्यानगर येथील कामाठीपुरा भागातील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| सि.स.नं. | म्यु. घर. नं. | चौ.मी |
|---|---|---|
| १८६६/अ/३ | १६५९ | ६५.८७ |

**यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची दक्षिण बाजुकडील ३२.९३५ चौ. मी. जागा व त्यावरील तळ मजल्यावरील बांधकाम क्षेत्र २४.१० चौ. मी. व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्र १९.६२ चौ. मी. असे एकुण बांधकाम क्षेत्र ४३.७२ चौ. मी. असुन अशी बांधकामासह मिळकत बाबत.**

**यासी चतु:सिमा–**

पुर्वेस – रस्ता,
पश्चिमेस – लागू सिटी सर्व्हे नंबर १८६६/अ/६
दक्षिणेस – लागु सिटी सर्व्हे नंबर १८६६/ब
उत्तरेस – सि.स.नं. १८६६/अ/३ पैकी अब्दुल वाहिद मोहम्मद सादिक शेख यांची मिळकत

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

ॲडव्होकेट
नाजीम अहमद इस्माईल शेख
कुरेशी फैजान फारुक
जीपीओ रोड,कलेक्टर ऑफिसशेजारी अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

दि.३१/०७/२०२५
अहमदनगर.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिल यांच्याबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता. ३१/०७/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे चाहुराणा बुद्रुक** येथील **स्मृती गृहनिर्माण सहकारी गृहरचना मर्या या सोसायटी** मधील बिगरशेती प्लॉटसह बांधकाम मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

**सर्व्हे नं. ७७/४ क/७६/४/७७/३ मधील प्लॉट नं.४१ (संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नं. ७७/४ क/७६/४/७७/३/प्लॉट ४१) चे एकुण क्षेत्र २८२.७५ चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट मिळकत व त्यावर ग्राऊंड फ्लोअरचे बांधकाम क्षेत्र ६४.४३ चौ.मी. व फर्स्ट फ्लोअरचे बांधकाम क्षेत्र २०.४१ चौ.मी. असे एकुण बांधकाम क्षेत्र ८४.८४ चौ.मी. प्लॉटसह बांधकाम असलेली मिळकत.**

**यांसी चतु:सीमा –**

पूर्वेस : प्लॉट नं. ४२ दक्षिणेस : ९.०० मीटर रुंदीचा रस्ता
पश्चिमेस : प्लॉट नं.४० उत्तरेस : सर्व्हे नं.७७ पैकी

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**
**१.सुहास विनायक निसळ**
**२.पराग विनायक निसळ**
दोघे रा. सातभाई मळा, बालिकाश्रम जवळ, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर. मो. नं. 9011678999. 9860805559

